21-05-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 5/20/2025 11:25 PM Page 1



काणकोण रवींद्र भवनला पहिल्याच पावसात गळती » पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



आयपीएलचा अंतिम सामना अहमदाबादमध्ये » पान ४ वर

वेर्णा, बुधवार, २१ मे २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 258 | Verna, | facebook.com/dainikherald | Wednesday 21 May 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### मुर्शिदाबाद हिंसाचार; ११३ घरांचे नुकसान

**कोलकाता, दि. २०** : पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद जिल्ह्यात एप्रिलमध्ये झालेल्या जातीय हिंसाचाराच्या संदर्भात कोलकाता उच्च न्यायालयाने स्थापन केलेल्या चौकशी समितीने गंभीर खुलासे केले आहेत. त्यात म्हटले आहे की, सत्ताधारी तृणमूल काँग्रेस (टीएमसी) च्या एका स्थानिक नेत्याची हिंसाचारात भूमिका होती. स्थानिक नगरसेवक मेहबूब आलम यांनी हे हल्ले केले. अहवालानुसार, हिंसाचारात विशेषतः हिंदू समुदायाला लक्ष्य करण्यात आले. या काळात स्थानिक पोलिस पूर्णपणे निष्क्रिय राहिले. पीडितांनी अनेकवेळा पोलिसांना फोन केला, पण कोणतीही मदत मिळाली नाही. खरंतर, १७ एप्रिल रोजी उच्च न्यायालयाने तीन सदस्यीय समिती स्थापन केली होती. त्यात राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, पश्चिम बंगाल मानवाधिकार आयोग आणि राज्य कायदेशीर सेवा प्राधिकरणातील प्रत्येकी एक सदस्य होता. पश्चिम बंगालमध्ये, ११-१२ एप्रिल रोजी नवीन वक्फ बोर्ड कायद्याविरुद्धच्या निदर्शनांमध्ये जमाव हिंसक झाला.

---

### बंगळुरूमध्ये ५०० घरे पाण्याखाली, ३ जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली, दि. २०** : आज मंगळवारी हवामान खात्याने मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशसह ११ राज्यांमध्ये वादळ आणि पावसासह वादळाचा इशारा जारी केला आहे. झारखंडमध्ये वीज पडून ५ आणि महाराष्ट्रात २ जणांचा मृत्यू झाला आहे. झारखंड आणि बिहारसह १३ राज्यांमध्ये आज मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. सोमवारी बंगळुरूमध्ये मुसळधार पाऊस सुरूच आहे. शहरातील बहुतेक रस्ते पाण्याखाली गेले आहेत. ५०० हून अधिक घरांमध्ये पाणी शिरले आहे. बीटीएम लेआउटमधील एका पुराच्या अपार्टमेंटमध्ये १२ वर्षांच्या मुलाचा आणि ६३ वर्षांच्या एका पुरूषाचा विजेचा धक्का बसून मृत्यू झाला. व्हाईटफील्डमध्ये भिंत कोसळून एका ३५ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला. हवामान खात्याने आजही मुसळधार पावसाचा यलो अलर्ट जारी केला आहे.

---

### अफगाणिस्तानही पाकिस्तानचे पाणी रोखणार

**काबुल, दि. २०** : भारतानंतर आता अफगाणिस्तानही पाकिस्तानकडे जाणारे पाणी रोखण्यासाठी धरण बांधण्याची तयारी करत आहे. तालिबान सरकारचे आर्मी जनरल मुबिन यांनी कुनार नदीवर बांधल्या जाणाऱ्या धरणाची पाहणी केली. बलुच नेते मीर यार बलुच यांनी सोमवारी सोशल मीडियावर जनरल मुबीन यांच्या भेटीचा व्हिडिओ शेअर केला. जनरल मुबिन यांनी तालिबान सरकारला हे धरण बांधण्यासाठी निधी उभारण्याचे आवाहन केले. ते म्हणाले- हे पाणी आमचे रक्त आहे आणि आम्ही आमचे रक्त आमच्या नसांमधून बाहेर पडू देऊ शकत नाही. आपल्याला आपले पाणी धरून ठेवावे लागेल. यामुळे आपल्या विजेच्या गरजा पूर्ण होतील आणि आपण शेतीत त्याचा वापर करून उत्पादन वाढवू.

---

### चीनने सरकारी अधिकाऱ्यांच्या खर्चात कपात

बीजिंग, दि. २० : चीनमध्ये सरकारने आपल्या अधिकाऱ्यांना दारू आणि सिगारेटवरील खर्च कमी करण्याचे निर्देश दिले आहेत. यासोबतच, लोकांना प्रवास, जेवण आणि ऑफिसच्या ठिकाणांवरील खर्च कमी करण्यास सांगितले आहे. सरकारी खर्च कमी करण्यासाठी रा÷ष्ट्रपती शी जिनपिंग आणि कम्युनिस्ट पक्षाने हा निर्णय घेतला आहे. चीनमध्ये आता कार्यालयांमध्ये महागडे अन्न, दारू आणि सिगारेट मिळणार नाहीत. कार्यक्रमात भव्य फुलांची सजावट होणार नाही. चीनच्या शिन्हुआ न्यूज एजन्सीनुसार, चीनच्या कम्युनिस्ट सरकारने अधिकाऱ्यांकडून कठोरता आणि खर्चात बचत करण्याची मागणी केली आहे.ज्यामध्ये अधिकाऱ्यांना सरकारी संसाधनांचा काळजीपूर्वक वापर करण्यास आणि व्यर्थ खर्च रोखण्यास सांगण्यात आले आहे.

# मान्सूनपूर्व पावसाचे धुमशान..!

## म्हापसा परिसराला जबरदस्त फटका | खोर्लीत घरांमध्ये पाणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २० : राज्यात मागील दोन दिवसांपासून हलक्या सरींची सुरुवात झाल्यानंतर मंगळवारी (२० मे) पहाटेपासून मुसळधार मान्सूनपूर्व पावसाने राज्यभर झोडपून काढले. काणकोणपासून पेडण्यापर्यंत सर्व भागांत जोरदार पावसाची नोंद झाली असून, म्हापसा परिसराला या पावसाचा जबरदस्त तडाखा बसला. खोर्ली येथील अनेक घरांमध्ये पूर्णत: पाणी भरले आणि रहिवाशांच्या किमती वस्तूंचे नुकसान झाले. काही दुचाकी देखील या पाण्याच्या लोंढयात वाहून गेल्याचे कळते आहे.**



राजधानी पणजीसह पर्वरी, बार्देश, फोंडा, सासष्टी, मुरगाव, डिचोली, धारबांदोडा, सत्तरी आणि तिसवाडी भागात पावसाचा जोर अधिक होता. डिचोलीमध्ये पावसाचा विशेष फटका बसला असून अनेक ठिकाणी गटारे तुंबली आहेत व रस्ते जलमय झाले आहेत. पणजीत सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास झालेल्या तासभराच्या जोरदार पावसामुळे मुख्य रस्त्यांवर पाणी साचले. काही भागांत वीज पुरवठा खंडित झाला असून, नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला आहे.

पावसामुळे देशी पर्यटकांचीही तारांबळ उडाली आहे. किनाऱ्यांवर आलेल्या पर्यटकांना पावसामुळे सुरक्षित आसऱ्यांचा शोध घ्यावा लागला. दुसरीकडे, स्मार्ट सिटी अंतर्गत सुरू असलेली कामे व पर्वरीतील उड्डाणपुलाच्या कामावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. भूमिगत वीजवाहिन्यांसाठी खोदलेले चर तात्पुरत्या मातीने बुजवण्यात आले होते, मात्र पावसामुळे ही खड्डे पुन्हा उघड झाली आहेत, त्यामुळे अपघातांची शक्यता वाढली आहे.

खोर्ली परिसरात अनेक नालेसफाई झाली नसल्याने पहिल्याच पावसात पाणी थेट लोकांच्या घरात घुसले . अचानक पाणी भरल्याने किमती वस्तु वाचवण्यासाठी घरातल्या महिलांची तारांबळ उडाली. अनेकवेळा सांगूनही नगरसेवक नालेसफाईकडे दुर्लक्ष करीत असल्याचे संतप्त रहिवाशांनी सांगितले. मान्सूनपूर्व पावसात जर असे पाणी भरत असेल तर पाऊस सुरू झाल्यावर काय होईल याची भीती नागरिकांनी व्यक्त केली .

हवामान विभागाने पुढील दोन दिवसांसाठी (मंगळवार व बुधवार) 'ऑरेंज अलर्ट' जारी केला आहे. २२ ते २६ मे दरम्यान काही भागांत 'यलो अलर्ट' देण्यात आला असून, या कालावधीत मुसळधार पावसासोबत ताशी ५० ते ७० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता असल्याचा इशारा दिला आहे. राज्यातील नागरिकांनी सतर्क राहण्याचे आणि अनावश्यक प्रवास टाळण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. पावसामुळे रस्त्यांची अवस्था बिकट झाली असून, वाहतुकीवरही परिणाम होत आहे. पुढील काही दिवस राज्यात मान्सूनपूर्व वातावरण कायम राहण्याची शक्यता आहे.

# कामगारविरोधी धोरणांविरोधात 'आयटक'चा निषेध

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २०** : सरकारच्या कामगारविरोधी धोरणांविरोधात ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस (एआयटीयूसी), गोवा शाखेने मंगळवारी आझाद मैदानावर अर्धदिवसीय प्रतीकात्मक आंदोलन केले.

याआधी हे आंदोलन २० मे रोजी होणार होते, परंतु जम्मू-काश्मीरमधील पेहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर आंदोलन पुढे ढकलण्यात आले. त्याऐवजी एआयटीयूसीने अर्धा दिवस शांततेत निषेध नोंदवत सरकारकडे आपली भूमिका स्पष्ट केली.

या आंदोलनामध्ये केंद्र आणि राज्य सरकारच्या कामगार व जनविरोधी धोरणांचा निषेध करत विविध मागण्या मांडण्यात आल्या. त्यामध्ये चार नवीन कामगार संहिता रद्द करणे, शेतकरीविरोधी कायदे मागे घेणे, संयुक्त किसान मोर्चाशी झालेल्या करारांची अंमलबजावणी करणे, सार्वजनिक क्षेत्रातील युनिट्सचे खाजगीकरण थांबवणे, वीज विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित करणे, प्रत्येक कामगाराला सामाजिक सुरक्षा मिळावी यासाठी प्रयत्न करणे आणि दरमहा किमान रु. १० हजार पेन्शन देणे यांचा समावेश होता.

एआयटीयूसीचे गोवा राज्य सरचिटणीस क्रिस्टोफर फोन्सेका यांनी संबोधित करताना सरकारवर सडकून टीका केली. ते म्हणाले की, सध्याचे सरकार गरिबांचे, दलितांचे आणि महिलांचे शोषण करत आहे. कामगारांचे हक्क हिरावून घेतले जात आहेत आणि जनविरोधी कायदे लादले जात आहेत.

संघटनेचे नेते राजू मंगेशकर यांनी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर स्पष्ट केले की, आजचे आंदोलन हे पूर्णतः प्रतीकात्मक स्वरूपाचे होते. येथे कोणीही वैयक्तिक मागण्या घेऊन आले नव्हते. केंद्र सरकारने लागू केलेल्या चार कामगार संहितांना आणि राज्य सरकारने दिलेल्या अंमलबजावणीच्या आदेशांना आम्ही स्पष्ट शब्दांत विरोध करतो.

ते पुढे म्हणाले, केंद्राने शेतकरी कायदे मागे घेतल्याचे फक्त मौखिक जाहीर करून चालणार नाही. त्यासाठी राजपत्र अधिसूचना काढणे आवश्यक आहे. देशातील बेरोजगारीचा प्रश्न गंभीर आहे. कामगारांना किमान रु. २६,हजार वेतन मिळाले पाहिजे. मनरेगा अंतर्गत किमान २०० दिवस रोजगार हमी मिळायला हवी.

यावेळी उपस्थित असलेले अधिवक्ता सुहास नाईक यांनी सांगितले की, देशभरातील कामगार संघटनांनी २० मे रोजी राष्ट्रव्यापी आंदोलनाची हाक दिली होती. मात्र, दहशतवादी हल्ल्यानंतर तो कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला. आता ९ जुलै २०२५ रोजी संपूर्ण देशभर मोठ्या प्रमाणावर निदर्शने करण्यात येणार आहेत, ज्यामध्ये विविध संघटनांचे आणि सार्वजनिक क्षेत्रातील घटकांचे प्रतिनिधी सहभागी होतील.

# उपराष्ट्रपती धनखड गोव्यात दाखल

## मुरगाव प्रकल्पांवरुन वादंग | दक्षिण गोवा खासदारांकडून बहिष्काराचे संकेत

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २०** : भारताचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड मंगळवारपासून तीन दिवसांच्या गोवा दौऱ्यावर आले आहेत. त्यांच्या स्वागतासाठी आयएनएस हंसा (दाबोळी) येथे राज्यपाल पी. एस. श्रीधरन पिल्लई, मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक, राजशिष्टाचार मंत्री माविन गुदिन्हो, विधानसभा अध्यक्ष रमेश तवडकर, विरोधी पक्षनेते युरी आलेमाव, खासदार सदानंद शेट तानावडे, दक्षिण गोव्याचे खासदार कॅप्टन विरियातो फर्नांडिस, मुख्य सचिव डॉ. व्ही. कँडावेलो आणि अन्य मान्यवर उपस्थित होते. उपराष्ट्रपतींसोबत त्यांची पत्नी डॉ. सुदेश धनखडही उपस्थित होत्या.

उपराष्ट्रपती बुधवारी (२१ मे) मुरगाव बंदराला भेट देणार असून तेथील विविध नविन प्रकल्प राष्ट्राला समर्पित करणार आहेत. यामध्ये बर्थ क्रमांक १० आणि ११ येथे उभारण्यात आलेला कोळसा हाताळणीसाठीचा झाकलेला घुमट आणि दोन हार्बर मोबाईल क्रेन यांचा समावेश आहे. या वेळी ते मुरगाव बंदर प्राधिकरणाच्या (एमपीए) वरिष्ठ अधिकारी व कर्मचाऱ्यांशी तसेच भारतीय तटरक्षक दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संवाद साधतील.

२२ मे रोजी उपराष्ट्रपती आयसीएआर-सेंट्रल कोस्टल ॲग्रिकल्चरल रिसर्च इन्स्टिटट्यूट ला भेट देऊन तेथील प्राध्यापक व शास्त्रज्ञांशी चर्चा करणार आहेत. त्यानंतर ते राजभवनात चरक आणि सुश्रुत यांच्या पुतळ्यांचे अनावरण करणार असून आयुर्वेद व शस्त्रक्रिया क्षेत्रातील त्यांच्या योगदानाचा गौरव करण्यात येणार आहे.

दरम्यान, मुरगाव बंदरातील नविन प्रकल्पांचे उद्घाटन उपराष्ट्रपतींच्या हस्ते होत असले तरी दक्षिण गोव्याचे खासदार कॅप्टन विरियातो फर्नांडिस यांनी या कार्यक्रमावर बहिष्कार टाकण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

पान २ ▶

# बेफिकीर वीज खात्याने घेतला आणखी एकाचा बळी

## विजेचा धक्का लागून ऑन ड्यूटी कर्मचाऱ्याचा मृत्यू

■ टीम दैनिक हेराल्ड

**सत्तरी, दि. २०** : होडा-सत्तरी येथे वीज दुरुस्तीच्या कामादरम्यान विजेचा धक्का लागून एका कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला असून, दुसरा एक जखमी झाला आहे. चंद्र गावकर (वय ३८, रा. मोले-सत्तरी) असे मृत कर्मचाऱ्याचे नाव असून, सर्वेश गावकर हा यात जखमी झाला आहे. ही घटना सोमवारी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास घडली.

मान्सूनपूर्व देखभालीसाठी होडा पंचायत क्षेत्रात वीजपुरवठा सकाळपासून बंद करण्यात आला होता. दुपारी होंडा बसस्थानकासमोर वीज खांबावर दुरुस्तीचे काम सुरू असताना चंद्र गावकर, सर्वेश गावकर आणि राजाराम गुरव हे तिघेजण खांबावर चढून काम करत होते. याचदरम्यान, अचानक वीजपुरवठा पुन्हा सुरू करण्यात आला. त्यामुळे चंद्र गावकर यांना तीव्र विद्युतशॉक बसून जागीच मृत्यू झाला, तर सर्वेश गावकर जखमी झाला. राजाराम गुरव यांनाही विजेचा सौम्य झटका बसल्याचे सांगण्यात येते.

या घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, वीज विभागाच्या निष्काळजीपणावर स्थानिक नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. दुरुस्तीचे काम सुरू असताना कोणाच्या परवानगीने वीजपुरवठा सुरू करण्यात आला? असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. दरम्यान, या प्रकरणाची गंभीर दखल घेत ऊर्जा मंत्री सुदिन ढवळीकर यांनी विभागीय अधिकाऱ्यांकडून तातडीने स्पष्टीकरण मागवले आहे. त्यांनी या दुर्घटनेच्या सखोल चौकशीचे आदेशही दिले आहेत. घटनेनंतर सत्तरीतील जनतेमध्ये तीव्र संतापाची लाट पसरली असून, कनिष्ठ अभियंता आणि अन्य जबाबदार अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्याची जोरदार मागणी होत आहे. काँग्रेसच्या मनीषा उसगावकर यांनीही सरकारवर निष्काळजीपणाचा आरोप करत कडक शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे, ही घटना दुर्दैवाची पुनरावृत्ती ठरली आहे. तीन वर्षांपूर्वी ठाणे-डोंगुर्ली येथे असाच अपघात घडला होता. संजय गावकर नावाच्या कर्मचाऱ्याचा वीज खांबावर काम करताना मृत्यू झाला होता. संजय व चंद्र गावकर हे एकाच बॅचचे आणि घनिष्ठ मित्र होते.

त्या घटनेनंतरही प्रशासनाने काहीही शिकले नसल्याचे या नव्या दुर्घटनेतून स्पष्ट झाले आहे. ऊर्जा विभागाकडून चौकशीचे आदेश देण्यात आले असले, तरी दोषींवर तातडीने कारवाई होईपर्यंत नागरिकांचा रोष शांत होण्याची शक्यता नाही. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई केली जावी, अशी मागणी आता जनतेकडून जोर धरत आहे.



आमचे श्रद्धास्थान
स्वर्गीय गोपीनाथ शिवराम पाटील
संस्थापक, अध्यक्ष
(एम कॉम, एल.एल.बी)

जीपी पारसिक सहकारी बँक लि.
(मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक)
स्थापना: १९७२

अतूट नात्याची व विश्वासाची ५३ वर्षे

अतूट विश्वास आणि सहकार्याबद्दल बँकेचे सभासद, ग्राहक व हितचिंतक यांचे मन:पूर्वक आभार

आर्थिक स्थिती

(₹ कोटींमध्ये)

| तपशील | ३१-०३-२०२४ | ३१-०३-२०२५* | (+/-) |
|---|---|---|---|
| निव्वळ नफा | ५२.१५ | ५९.३७ | ७.२२ |
| स्वनिधी | ५०३.५७ | ५३९.७७ | ३६.२० |
| कर्जे | २०५८.२५ | २४२०.०८ | ३६१.८३ |
| ठेवी | ४५२६.९९ | ४७८४.१३ | २५७.१४ |
| एकूण व्यवसाय | ६५८५.२४ | ७२०४.२१ | ६१८.९७ |
| नेट एन.पी.ए | ०.००% | ०.००% | — |
| ग्रॉस एन.पी.ए | ४.१३% | २.२४% | -१.८९% |
| सी.आर.ए.आर | २१.७० | १८.७२ | -२.९८% |

*(अलेखापरीक्षित)

अधिक माहितीसाठी www.gpparsikbank.com वर भेट द्या किंवा आमच्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधा | टोल-फ्री क्रमांक १८०० २२४ ५४५

महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटक